बुधवार, दि १ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ५ वा ● किमंत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# झोपडपट्टीवासीयांना मालमत्ता पत्रक द्या

## कैलास गोरंट्याल यांची महसूल मंत्र्यांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना मालमत्ता पत्रक (पी. आर. कार्ड) देण्याची तातडीची मागणी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांच्याकडे केली आहे. मंत्री श्री बावणकुळे यांनी जालना जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश दिले असल्याची माहितीही माजी आ. गोरंट्याल यांनी माध्यमांशी बोलतांना दिली.

### झोपडपट्टीवासीयांना पी.आर. कार्डाचा आ. खोतकरांचा दावा फोल ?

जालना शहरातील झोपडपट्ट्यांतील रहिवाशांना मालमत्ता पत्रक (पी.आर. कार्ड) मंजूर झाल्याचा दावा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी गेल्या महिन्यात केला होता. या दाव्याचे मोठे फलक व बॅनर्स शहरात ठिकठिकाणी लावण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात झोपडपट्टीवासीयांना अद्याप कोणतेही पी.आर. कार्ड मिळालेले नसल्याने या दाव्याचा फोलपणा उघड होत आहे. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी नुकतेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांना दिलेल्या निवेदनातून झोपडपट्ट्यांतील नागरिकांना पी.आर. कार्ड देण्याची मागणी केली. या पार्श्वभूमीवर नागरिकांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, आमदार खोतकर यांनी केलेला दावा आणि फलकबाजी ही केवल फुसकी ठरली अशी टीका जनतेतून होत आहे. गोरंट्याल यांच्या मागणीनंतर आता खोतकर यांच्या फलकबाजीवर विरोधकांनी टीका सुरू केली आहे. राजकीय वर्तुळातही चर्चा रंगली असून, फक्त घोषणा करून आणि फलक लावून प्रश्न सुटत नाही, प्रशासनाकडून प्रत्यक्ष आदेश व वितरण होणे गरजेचे असल्याचे मत झोपडपट्टीवासियांकडून होत आहे. खोतकर यांच्या पी.आर. कार्ड मंजुरीच्या दाव्यानंतर प्रत्यक्षात नागरिकांना कार्ड न मिळाल्याने जनतेत नाराजी आहे. गोरंट्याल यांच्या ताज्या मागणीमुळे या प्रश्नावर पुन्हा एकदा राजकीय तापमान वाढले आहे.

जालना शहरातील ४० ते ४२ झोपडपट्ट्यांमध्ये गेल्या चार ते पाच दशकांपासून हजारो कुटुंबे वास्तव्यास आहेत. पण अद्याप त्यांना मालमत्ता पत्रक मिळालेले नाही. त्यामुळे या रहिवाशांना स्वतःचे हक्काचे घर असूनही ते कायदेशीरदृष्ट्या 'बेकायदेशीर' ठरतात. शासनाच्या कोणत्याही कल्याणकारी योजना, बँकेचे कर्ज, बांधकाम परवानगी यापैकी कोणताही लाभ त्यांना मिळू शकत नाही.

गोरंट्याल यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नागरिकांची घरे व जागा नियमांनुसार नियमित केल्यास त्यांना पी.आर. कार्ड मिळेल. पी.आर. कार्डमुळे नागरिकांना घरावर कर्ज घेणे, घरकुल योजना व इतर शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. घर बांधण्यासाठी कायदेशीर परवानगी मिळेल, तसेच मालकी हक्क नोंदवला जाईल. झोपडपट्टीवासीयांचा संताप उफाळून आला आहे. आम्ही ४०-५० वर्षांपासून या झोपडपट्टीत राहतोय. घर आहे, पण हक्क नाही. मालमत्ता पत्रक नसल्यामुळे कधीही झोपडपट्टी हटवली जाईल या भीतीत आम्हाला राहावे लागते. मुलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, कुटुंबाला शासकीय योजना काहीही मिळत नाही. शासनाने आमचा विचार करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



झोपडपट्टीवासीयांच्या या प्रश्नावर अनेक वर्षांपासून विविध पातळीवर चर्चा होत असली तरी ठोस निर्णय झाला नाही. गोरंट्याल यांनी ही मागणी पुन्हा एकदा पुढे आणल्यामुळे नगरविकास विभाग व महसूल विभागाच्या भूमिकेवर लक्ष केंद्रीत झाले आहे.

स्थानिक प्रशासनाकडे झोपडपट्टीवासीयांची यादी असून ती नियमितीकरणासाठी तयार केली आहे, अशी माहिती मिळत आहे. मात्र राज्य शासनाकडून अंतिम मंजुरी मिळेपर्यंत प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही.

जालन्यातील हजारो झोपडपट्टीवासीयांसाठी 'मालमत्ता पत्रक' हा केवळ कागदाचा तुकडा नसून त्यांच्या जगण्याचा हक्क आहे. गोरंट्याल यांच्या निवेदनामुळे या प्रश्नाला पुन्हा एकदा गती मिळणार आहे.

# शिवसेना दलित आघाडीचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक जनआक्रोश आंदोलन

## दलित आदिवासी भुमिहिन, कास्तपट्टे नावे करुन सातबारा द्या

**जालना । प्रतिनिधी -** राज्यात दलित आदिवासी भूमीहिन कास्त पट्टे नावे करून, ७/१२ उतारा देण्यात यावा व शासकीय पडीत जमिनीवर शेतीसाठी झालेले अतिक्रमण नियमानुकुलित करावे. तसेच जनहिताच्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी व विज वितरण कंपनीला आपण ताकीद द्यावी, अशी मागणीही शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी केली आहे.

जिल्ह्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तपट्टे नावे करुन सातबारा देण्यात यावा, यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी आज शिवसेना दलित आघाडीच्या वतीने शिवसेना दलित आघाडी जिल्हाप्रमुख तथा दलित आदिवासी नेते ॲड.भास्करराव मगरे यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील कानाकोपर्यातून भुमिहिन,कास्तकर प्रचंड प्रमाणात उपस्थित होते. यावेळी प्रशासनाविरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली.

मोर्चा दरम्यान अंबड चौफुली ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चाकर्यांनी प्रचंड गर्दी केल्याने वाहतुक काही थांबली होती. दरम्यान




अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने काढण्यात आलेल्या मोर्चाचे सर्वत्र कौतुकही होत आहे. यावेळी जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे, जिल्हा सचिव जय खरात, उपजिल्हाप्रमुख अण्णासाहेब बाळराज यांच्यासह हजारो भुमिहिन कास्तकरांची उपस्थिती होती. दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख भास्करराव मगरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाडा विशेषतः जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी भूमिहीन कास्तपट्टे नावे करून ७/१२ देण्यात यावा. राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील दलित आदिवासी भूमिहीन कास्तकारांना शासनाने प्रदान केलेल्या शेतजमीनी गायरान, सिलिंग ॲक्टमधील शेत जमिनी, इनामी, अतिवृष्टीमुळे शेतकरी हवालदिल झाला असल्याचे चित्र समोर दिसत आहे. शासनाच्या वतीने कृषिमंत्री जिल्ह्याचे पालकमंत्री अतिवृष्टीने पिकाचे झालेले नुकसानीची पाहणी दौरा करीत आहेत. दुसरे बाजूने प्रशासकीय स्तरावर अतिवृष्टीने उभे पिकाचे नुकसान भरपाई पंचनामे सुरू आहेत. शेतकर्याचे उभे पिकाच्या नुकसान भरपाई पंचनामासोबत दलित आदिवासी भूमिहीन कास्तपट्टे पान ३ वर

# माणुसकीचा आदर्श

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सरपंच संदीप पवार यांनी दिले एका वर्षाचे मानधन




**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात सततधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकरी हा देशाचा कणा असून त्यांचे हाल अपेष्टे ही संपूर्ण समाजाची वेदना आहे. या आपत्कालीन परिस्थितीत अनेक नागरिक, सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती पुढे येऊन मदतीचा हात देत आहेत. याच पार्श्वभूमीवर अंबड तालुक्यातील झिरपी गावाचे सरपंच संदीप पवार यांनी आपल्या माणुसकीचे उत्तम दर्शन घडवत एक आगळा-वेगळा निर्णय घेतला आहे.

शासनाकडून सरपंचांना मिळणाऱ्या मानधनापैकी एक वर्षाच्या कालावधीतील रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दान करण्याचा नवा आदर्श त्यांनी घालून दिला आहे. मंगळवार दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी सरपंच संदीप पवार यांनी हा धनादेश थेट जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडे सुपूर्द केला.

या वेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी संदीप पवार यांच्या या कार्याचे मनापासून कौतुक करत आभार मानले. त्या म्हणाल्या की, समाजातील प्रतिनिधींनी अशी जबाबदारीची भूमिका घेतली, तर शेतकऱ्यांचे दुःख कमी करण्यास हातभार लागेल. इतरांनीही या उपक्रमातून प्रेरणा घ्यावी.

ग्रामीण भागातील निवडून आलेले लोकप्रतिनिधी केवळ विकासकामांपुरते मर्यादित न राहता, समाजहिताच्या संकटाच्या काळात स्वतःचा हक्काचा निधी दान करण्यासाठी पुढे सरसावतात, ही घटना खरोखरच आदर्शवत आहे.

संदीप पवार यांच्या या निर्णयामुळे झिरपी गावातील ग्रामस्थांसह संपूर्ण जिल्ह्यात कौतुकाची लाट पसरली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने शक्य तितक्या प्रमाणात मदतीसाठी पुढे यावे, हा संदेश या कार्यातून स्पष्टपणे उमटतो.

## संपादकीय

# प्रशासनाची निष्क्रियता की माफियाची सक्रियता

जालना जिल्ह्यातील परिस्थिती आज गंभीर वळणावर आली आहे. गुटखा माफिया सतीश उर्फ लाला यासारख्या व्यक्तींना पोलिस प्रशासनाचे संरक्षण मिळत असल्याचे आरोप टाळता येणार नाहीत. कारण प्रत्यक्ष वास्तव असे आहे की, गुटखा विक्रीवर शासनाने बंदी घातली असूनही हा व्यवसाय खुलेआम सुरू आहे. या परिस्थितीत नागरिकांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता व संताप ही स्वाभाविक प्रतिक्रिया आहे.

गुटखा हा केवळ तंबाखूजन्य पदार्थ नाही; तो हजारो लोकांचे जीवन हिरावून घेणारे 'मृत्यूचे बीज' आहे. मुखाचा कर्करोग, पचनाचे विकार, दात-हाडांचे आजार हे सर्व गुटख्याचे थेट परिणाम. परिणामी कुटुंबे उद्ध्वस्त होतात, तर आरोग्य व्यवस्थेवर प्रचंड ताण निर्माण होतो. शाळा-कॉलेज परिसरात गुटखा सहज मिळत असल्याने तरुणाई सर्वाधिक प्रभावित होत आहे. पुढील पिढीची तब्येत धोक्यात येणे ही समाजाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारी बाब आहे.

स्थानिक नागरिकांच्या अनुभवातून स्पष्ट होत आहे की हप्ता दिला की कायदा झोपतो. लहान व्यवसायांवर पोलिसांची कठोर कारवाई दिसते, पण गुटखा माफियांना हातही लावला जात नाही. यामुळे कायद्याचा गाभा संपुष्टात येतो. जेव्हा पोलिस प्रशासनच संरक्षण देत असल्याची छाया निर्माण होते, तेव्हा प्रामाणिक नागरिक भीतीत जगतात आणि गुन्हेगारी वृत्तीला खतपाणी मिळते.

कायद्याचे मूळ तत्व आहे; सर्वांसाठी समान न्याय. पण गुटखा माफियांच्या बाबतीत अपवाद केला जातो आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांचा कायद्यावरील विश्वास हादरतो, समाजात दुटप्पीपणाचे चित्र ठळक होते. परिणामी, न्यायव्यवस्था आणि लोकशाहीवरील श्रद्धा धोक्यात येते.

गुटख्याची निर्मिती, साठा व विक्री खाद्य सुरक्षा व मानके कायदा २००६ (FSSI Act) अंतर्गत प्रतिबंधित आहे. कलम २६ व २७ : सुरक्षित अन्न पुरविण्याची जबाबदारी उत्पादक व विक्रेत्यांवर आहे. कलम ५९ : असुरक्षित अन्न विक्रीबद्दल जेल व दंडाची तरतूद आहे. तसेच नवीन भारतीय दंड संहिता (BNS, २०२३) नुसार कलम २७४ (जुना IPC २७२-२७३) : अपायकारक अन्न किंवा पेय विक्रीसाठी कठोर शिक्षा. कलम २८४ : सार्वजनिक आरोग्यास हानी पोहोचविणाऱ्या पदार्थांच्या विक्रीमुळे कैद व दंड. यावरून गुटखा विक्री हा फक्त 'आरोग्याचा' मुद्दा नसून थेट दंडनीय गुन्हा आहे.

गुटखा विक्रीवर बंदी असूनही तो सुरू राहणे ही प्रशासनाच्या निष्क्रियतेची कबुली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी; गुटखा माफियांच्या आर्थिक मुळांवर घाव घालणाऱ्या विशेष मोहिमा राबविणे आवश्यक आहे. पोलिस व प्रशासनातील दोषींवर सखोल चौकशी व कठोर शिक्षा ही अपरिहार्य आहे. शाळा-कॉलेज परिसरात शून्य सहनशीलता धोरण लागू केले पाहिजे. आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन, महसूल व पोलिस या सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याची वेळ आली आहे. जालना जिल्ह्याची परिस्थिती ही केवळ एका माफियाची कहाणी नाही; ती कायद्याच्या अंमलबजावणीतील निष्क्रीयतेची कहाणी आहे. जर राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करून कठोर कारवाई केली नाही तर गुटखा व्यवसाय केवळ आरोग्याचे नाही, तर सामाजिक बांधिलकीचे आणि न्यायव्यवस्थेच्या पाया ढासळण्याचे कारण ठरेल. गुटखा बंदी केवळ कागदावर न राहता वास्तवात अंमलात आली, तरच जनतेला वाटेल की कायदा अजून जिवंत आहे.

# बंगला दिसायलाच भारी पण काय कामाचा?

काही कामानिमित्त लातूरला गेलो होतो. लातूर वरून परत गावाकडे बसने येत होतो. लातूर ते अहमदपूर असा प्रवास होता. या प्रवासात बसने अहमदपूरला येत असताना बसमधील माझ्यासमोर बसलेल्या काही प्रवाशांचा विविध विषयावर बोलबाला चालू होता. मी मात्र शांत बसून त्यांच्या चर्चा ऐकत होतो. विविध विषयावर चर्चा करत असताना एक व्यक्ती म्हणाली की, श्रीमंताचा बंगला दिसायलाच भारी असतो पण काही कामाचा नसतो राव. आम्ही एका श्रीमंत नातेवाईकाच्या बंगल्यात गेलो होतो. काम होते मुलगी पाहण्याचे. मुलगी पाहिली, विषयावर चर्चा केली आणि एकमेकांनी एकमेकांना विचार करून सांगू असे बोलणे झाल्यावर ते श्रीमंत पाहुणे म्हणाले की आता तुम्ही या, आम्ही पुढचं पुढी बघू. एवढे सांगून त्यांनी त्या पाहुण्यांना त्या बंगल्याच्या बाहेर काढून दिले. साधा चहा नाही, पोहे नाही ना जेवण नाही, फक्त पाणी तेवढे दिले आणि त्यांना घराबाहेर काढून दिले. बंगला हायफाय होता, सोयरे श्रीमंत होते पण त्या श्रीमंत घरात अतिथी देवो भव मानणारी संस्कृती त्या घरात पाहायला मिळाली नाही. मुलगी बघायला गेलेले पाहुणे मात्र तिथून निराश होऊन रिकाम्या पोटी आले. त्यांना कळून चुकले की, श्रीमंताच्या महालापेक्षा गरीबाची झोपडी ही कधीही बरीच असते. आणि अशा श्रीमंत घरासोबत सोयरपण जुळवणे काही कामाचे नसते. श्रीमंतांच्या घरी माणुसकीचा लवलेशही नसतो. त्यांना माणसांची किंमत नसते. त्यांना घरातील पाळीव कुत्र्यांची माणसांपेक्षा अधिक किंमत असते. बंगला दिसायला हायफाय होता. पण त्या बंगल्यात सोयरपणाच्या नात्याने जी पाहुण्यांची सोय व्हायला पाहिजे होती ती पाहुण्यांची सोय तिथे झाली नाही. मग असल्या बंगल्याला पाहून आणि मुलीला देऊन श्रीमंतांना जवळ करून व त्यांच्याशी सोयरपणाचे संबंध जोडून उगाच माणुसकीच्या नात्याला कलंक लावण्याची गरज नाही. उलट श्रीमंतांपेक्षा गरिबांच्या महालात म्हणजेच झोपडीत सोयऱ्यांचा आदर करणारी व अतिथी देवो भव मानणारी संस्कृती पहायला मिळते. म्हणून कधीही श्रीमंतांच्या महालापेक्षा गरीबाची झोपडी बरी असते हे काय उगीच म्हटले नाही. गरिबांकडे पैसा असो अथवा नसो, ते बिचारे काहीही करतील परंतु घरी आलेल्या सोयऱ्यांची सोयरपणाच्या नात्याने आदरातिथ्य पाहुणचार करतील आणि ख्यालीखुशाली विचारून त्यांना मनःपूर्वक निरोप देतील. म्हणून मी लेखक या नात्याने आतापर्यंत सांगत आलोय की, बाबांनो आपली मुलगी ही श्रीमंताघरी देण्यापेक्षा गरिबाघरी द्या. बंगल्याकडे, संपत्तीकडे अथवा जमीन जुमल्याकडे न बघता माणुसकीकडे बघून आपली मुलगी त्या घरामध्ये दिली पाहिजे. आणि आजकाल माणुसकी ही फक्त बंगल्यात नाही तर झोपडीत पाहायला मिळत आहे. शहरापेक्षा ग्रामीण भागात आपली मुलगी दिली तर ते अधिक चांगले होईल. कारण शहरी भागात अतिथी देवो भव समजणारी संस्कृती लोप पावली आहे आणि ग्रामीण भागात आजही पाहुण्यांचा आदर केला जातो..त्यांना चहापान करून आणि जेवण पाणी करून मगच जड अंतःकरणातून निरोप दिला जातो. श्रीमंताघरी पाळीव कुत्र्यांची सेवा केली जाते परंतु घरी आलेल्या पाहुण्यांना कोणीही विचारायला तयार नसतो, त्यांची यथोचित सोय केली जात नाही हे आजही शहरी भागात व मोठ्या बंगल्यात श्रीमंतांच्या घरी आपल्याला पाहायला मिळत आहे. मंडळी विचार करून बघा...हे पटतय का नाही पटतय? याचा विचार करा आणि मगच आपल्या मुलीला किंवा मुलाला माणुसकी बघून सोयरपण करण्याचा विचार करा..केवळ बंगल्याकडे आणि संपत्तीकडे बघून जर तुम्ही मुलीला श्रीमंताघरी देण्याचा विचार करत असाल तर तुमच्या मुलीचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही एवढे मी सांगतो.... तेव्हा त्यापैकी बसमधील बसलेला एक व्यक्ती म्हणाला की, बंगला दिसायला भारी असतो पण काय कामाचा नसतो राव...श्रीमंताच्या बंगल्यापेक्षा गरीबाची झोपडी बरी असते हो...मुली श्रीमंत घर न पाहता माणुसकी, इज्जत व अतिथी देवो भव मानणारी संस्कृती ज्या घरात नांदते त्याच घरात आपल्या मुली देण्याचा पालकांनी विचार करावा अशा चर्चा मला बसमधील प्रवाशांच्या ऐकायला मिळत होत्या आणि त्या चर्चा माझ्याही मनाला पटल्या की खरंच बंगला दिसायला भारी असतो पण काय कामाचा नसतो...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे, खंडाळी**
**ता.अहमदपूर जिल्हा लातूर मो.७४९८७१५६६१**

# लाखो भाविकांचे श्रद्धास्थान सौंदत्तीची येल्लम्मा देवी!

कर्नाटक राज्यात बेळगाव जिल्ह्यातील 'सौंदत्ती' हे एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. जिथे 'येल्लम्मा देवी'चे स्थान आहे. ही देवी दक्षिण भारतात विशेषतः महाराष्ट्र,कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूमध्ये मातृदेवी स्वरूपात पुजली जाते. अत्यंत प्राचीन असे हे मंदिर कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमेजवळील एक मुख्य तीर्थक्षेत्र असून विविध राज्यातील भाविक येथे देवीच्या दर्शनासाठी येतात. चला तर या देवस्थानाविषयी अधिक माहिती घेऊया...

**मंदिराचा इतिहास आणि स्वरूप..**

सौंदत्तीच्या येल्लम्मा माऊलीचे मंदिर हे इ.स.१५१४ च्या सुमारास बांधल्याचे सांगितले जाते. भारतीय मंदिर स्थापत्यकलेचा भाग असलेल्या चालुक्य शैलीतील वास्तुकलेचे उत्तम उदाहरण म्हणजे सौंदत्तीचे येल्लम्मा मंदिर. या मंदिरात 'येल्लम्मा देवी' ही मुख्य देवता आहे. जिला 'रेणुका माता' म्हणूनही ओळखले जाते. ही देवता परशुरामाची आई आणि महाशक्तीचा दिव्य अवतार आहे. या ठिकाणी विविध जाती-धर्माचे भक्त समुदाय मोठ्या श्रद्धेने देवीची उपासना करतात.



**मंदिराची आख्यायिका..**

पुरातन काळापासून सौंदत्तीची येल्लम्मा म्हणजेच रेणुका मातेच्या या मंदिराशी संबंधित एक आख्यायिका सांगितली जाते. त्यानुसार, रेणुका ही रेणु राजाची कन्या होती. जिने क्रोधासाठी प्रसिद्ध असलेल्या जमदग्नी ऋषींसोबत विवाह केला. ऋषी जमदग्नी आणि रेणुका यांना पाच पुत्र होते. त्यांपैकी एक म्हणजे परशुराम. रेणुकेला पतीप्रती असलेल्या पवित्रतेमुळे आणि भक्तीमुळे वाळूचे भांडे बनवण्याचे अलौकिक वरदान होते. एकेदिवशी आकर्षित झाली आणि यामुळे तिचे पावित्र्य भंगले. परिणामी रेणुकेला स्वतःची वाळूचे भांडे बनवण्याची शक्ती गमवावी लागली. देवशी रेणुकेला तपोबलाने ऋषी जमदग्नींना घडलेला प्रकार लक्षात आला. संतापाच्या भरात त्यांनी मुलांना मातेचा शिरच्छेद करण्याचा आदेश दिला. परशुरामांनी वडिलांच्या आज्ञेचे पालन केले आणि स्वतःच्याच आईचा शिरच्छेद केला. इतकेच नव्हे तर वडिलांच्या आज्ञेचे पालन करण्यास नकार देणाऱ्या आपल्या भावांचाही त्यांनी शिरच्छेद केला. परशुरामांना आपल्या हातून घडलेल्या कृत्याचा पश्चाताप होताच त्यांनी पित्याकडे आई आणि भावांचे प्राण परत मागितले. त्याक्षणी पितृआज्ञेचे पालन करणाऱ्या परशुरामांना ऋषी जमदग्नींनी जीवनदानाचा वर दिला. ज्याचा वापर करून परशुरामांनी आपल्या आईला आणि भावांना पुन्हा जिवंत केले. यावेळी परशुरामांनी काळा वर्ण असलेल्या एका मृत स्त्रीचे शीर माता रेणुकेच्या धडाला जोडले. ज्यामुळे रेणुका देवी 'येल्लम्मा' म्हणून ओळखली जाऊ लागली. अन्य काही आख्यायिकेनुसार, शिरच्छेदानंतर रेणुका मातेचे शीर ज्या ज्या ठिकाणी पडले त्या त्या ठिकाणी रेणुका देवीचे स्थान तयार झाले. त्यापैकी एक म्हणजे सौंदत्ती. दक्षिण भारतात या देवतेला 'संरक्षक देवी' म्हणून पुजले जाते.

**भक्तांची श्रद्धा**

सौंदत्तीची येल्लम्मा देवी अनेकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिरात पूजा केल्याने शारीरिक तसेच मानसिक त्रासातून मुक्ती मिळते. उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि जीवनात यश मिळते अशी भाविकांची श्रद्धा आहे. तसेच येल्लम्मा माऊलीकडे मनोभावे प्रार्थना केल्यास नकारात्मक शक्तींपासून रक्षण होते, असेही म्हटले जाते. या मंदिराशी गोंधळी, जोगतीण आणि देवदासी परंपरा पूर्वीपासून जोडलेली आहे. मात्र, गेल्या काही काळात सशक्त सामाजिक बदलांमुळे या परंपरा लोप पावताना दिसत आहेत. उदे ग आई उदे...!!

**शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# मराठवाड्यातील दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे

## मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मराठवाड्यात यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने अतिवृष्टीने अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी वर्गाचे न भूतो न भविष्यती असे नुकसान झाले आहे त्यामुळे मराठवाड्यातील दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, मराठवाड्यात यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने अतिवृष्टीने अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी वर्गाचे न भूतो न भविष्यती असे नुकसान झाले आहे. शालांत माध्यमिक व उच्च प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी- मार्च २०२६ साठी आवेदनपत्र भरणे सुरू आहे. आस्मानी संकटात सर्वस्व गमावलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची परीक्षा फीस भरण्याची ऐपत शेतकऱ्यांमधे राहिलेली नाही. मराठवाड्यातील शेतकरी वर्गाला आता मदतीची गरज आहे. अशा कालखंडात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मराठवाड्यातील दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करून अतिवृष्टीग्रस्त मराठवाड्यास मदतीचा हात द्यावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,कोषाध्यक्ष ए. बी.औताडे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रेमदास राठोड, आरेफ कुरेशी,जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, जिल्हा सचिव संजय येळवंते, मार्गदर्शक प्रा डॉ मारुती तेगमपुरे,प्रा डॉ पुरुषोत्तम जुने, सेवानिवृत्त शिक्षक गौतम बनसोडे,प्रा दत्ता देशमुख, सेवानिवृत्त मुख्याध्यापक अनंता जायभाये, शिवाजी केदार, कोषाध्यक्ष नारायण मुंडे,कार्याध्यक्ष फरकुंद अली सय्यद,उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, जगन वाघमोडे, जिल्हा सहसचिव गणेश चव्हाण, प्रद्युम्न काकड, दीपक शेरे, महिला प्रतिनिधी ज्योती पांगारकर,युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे, अंबड तालुका अध्यक्ष रमेश गाढे,तालुका सचिव गणेश मेहेत्रे, जाफराबाद तालुका अध्यक्ष सुधाकर डोईफोडे,तालुका सचिव बी टी लंके, बाबासाहेब बिडवे, विजयकुमार खरात, घनसावंगी तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर पवार, सचिव राधेश्याम चौधरी, शिवहरी कायंदे, प्रसिद्धी प्रमुख हकीम पटेल,भगवान धनगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## टीईटी परीक्षा सक्तीला शिक्षक संघटनांचा विरोध

# पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची मागणी



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** सर्वोच्च न्यायालयाने ०१ सप्टेंबरला शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) सक्तीची केल्याचा निर्णय दिला आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात येणार आहे.

या विरोधात महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती शिक्षक संघटना तसेच राज्यातील सर्व शिक्षक संघटना यांच्यामार्फत ४ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबईत महा मूक मोर्चा व सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. याचे नियोजन करण्यासाठी जालना जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांची सहविचार सभा जालना व बदनापुर तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्थेमध्ये आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, राज्य शासनाची पुनर्विचार याचिका, तसेच मोर्चाचे नियोजन या विषयांवर चर्चा झाली. यामध्ये सर्व शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या चर्चेनुसार सर्व शिक्षक संघटनांच्या राज्य कार्यकारिणीच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला.

यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे सरचिटणीस दिलीप जायभाये, प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष मधुकर काकडे, आदर्श शिक्षक समितीचे पदाधिकारी लक्ष्मणराव जोशी, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे पदाधिकारी राजेश मुंगीपैठणकर, तसेच प्राथमिक शिक्षक संघाचे कार्यकारी अध्यक्ष सुभाष भडांगे, गणेश भुतेकर, प्रमोद पवार इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## जालना शहरात भाजपच्या नवीन शाखेचे उदघाटन

# कार्यकर्त्यांना एकत्र आणणे हेच संघटनेचे मुख्य उद्दिष्ट - माजी आ. गोरंट्याल

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील प्रभाग क्र. १ संभाजीनगर परिसरातील पासी चौक येथे भारतीय जनता पार्टीच्या नवीन शाखेचे उदघाटन आज (दि.३०) रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. या शाखेच्या स्थापनेमुळे स्थानिक पातळीवरील संघटन अधिक बळकट होणार असून कार्यकर्त्यांना एकत्र येऊन पक्षविचारांवर काम करण्यासाठी नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या शाखेचे उदघाटन मा.आ. कैलासजी गोरंट्याल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या शाखा उदघाटन सोहळ्याचे आयोजन राजेश देसार यांनी केले केले.

यावेळी मा.आ.कैलासजी गोरंट्याल म्हणाले की, स्थानिक स्तरावर कार्यकर्त्यांना एकत्र आणणे हेच संघटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. भाजपच्या प्रत्येक शाखा आणि प्रभागातील कार्यकर्त्यांचे सहकार्य व उत्साह यांवरच आमच्या संघटनेचे यश अवलंबून आहे. नव्या शाखेच्या स्थापनेमुळे कार्यकर्त्यांना एकत्र येऊन पक्षविचारांवर काम करण्याची संधी मिळेल आणि स्थानिक पातळीवरील संघटना अधिक बळकट होईल.

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे म्हणाले की, शहरात भाजपच्या नव्या शाखेच्या




स्थापनेमुळे शहरातील पक्ष कार्य अधिक बळकट होईल. प्रत्येक प्रभागात मजबूत संघटना असणे हे विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. स्थानिक कार्यकर्त्यांना नव्या व्यासपीठावर एकत्र आणून, सकारात्मक विचार व मेहनत यावर आधारित कार्यक्रम राबविणे हे आमच्या उद्देशाचे मुख्य साधन आहे.

यावेळी प्रदेश निमंत्रित सदस्य राजेशजी राऊत, रामेश्वर पाटील भांदरगे, भाजपा युवा नेते अक्षय भैया गोरंट्याल, नवीन जालना मंडळाध्यक्ष सुनील खरे, उपाध्यक्ष धनराज काबलीये, सिद्धिविनायक मुळे, सरचिटणीस सुनील पवार, नगरसेवक सुनील राठी, जीवन सले, अर्जुन राऊत तसेच प्रभागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्यास उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला.

यामध्ये उपाध्यक्ष अनिल नवम हालकर, सचिव शेखर पवार, सह सचिव सागर घुगे, सल्लागार विकास नखलव, कोषाध्यक्ष पुरुषोत्तम सोसे, सह कोषाध्यक्ष कृष्णा नखलव, सदस्य शरद पवार, सदस्य कृष्णा नखलव, सदस्य अमित पवार, सदस्य कृष्ण देसार, सदस्य मंथन देसार, सदस्य विनोद हरदेकर, सदस्य विलास पवार, सदस्य दिनेश भदनेकर, सदस्य उमेश भदनेकर, सदस्य अभिजित चौधरी, सदस्य धनराज नखलव, सदस्य राजा ढाकणे, सदस्य मुकेश नवमहालकर, सदस्य ब्रिजेश ढोलके, सदस्य राजाराम हरिभाऊ शिंदे, सदस्य दिपक मोहिते, सदस्य मयूर पवार आदींची उपस्थिती होती.

## पुरग्रस्तांना धान्य व अन्य शिधा वस्तु वितरीत

**जालना -** जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून मुसळधार पाऊस झाला आहे. तसेच गोदावरी नदीच्या पात्रामध्ये जायकवाडी धरणातून तीन लाख क्युसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात आला. तसेच खडकपुर्णा प्रकल्पातूनही एक लाख क्युसेसपेक्षा अधिक जलविसर्ग करण्यात आलेला आहे. तरी या पार्श्वभूमिवर जिल्ह्यातील गोदावरी काठावरील तसेच पुर्णा नदीवरील पुरग्रस्तांना धान्य व अन्य शिधा वस्तु जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या निर्देशानूसार वितरीत करण्यात आल्या.


विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597


पान १ वरुन

## शिवसेना दलित ...

पंचनामे करण्यात यावेत, या अतिवृष्टीमुळे शेतीचे आणि उभी पिकाचे फार मोठे नुकसान झाले आहे. ग्रामीण भागात शेतकरी आणि शासकीय पड गायरान जमीन कास्तपट्टे दलित आदिवासी भूमीहीन गेल्या अनेक वर्षापासून वहीती मशागत करून कुटुंबाचा उदार निर्वाह करीत आहेत. मात्र दलित आदिवासी भूमीन कास्त पट्टे प्रशासनाने नियमानुकुलित करून ७/१२ उतार्याला नोंद न घेतल्यामुळे स्थानिक दलित आदिवासी भूमिहीन कास्तकार सरकारच्या मदतीपासून वंचित आहेत. आमची या निवेदनातून शासनाकडे मागणी आहे. शेतकरी ज्या पद्धतीने शेतीमध्ये मशागत करून उत्पन्न काढतात त्याच

पद्धतीने आम्ही दलित आदिवासी भूमिहिन कास्तकार शासकीय पड जमिनीमध्ये राबतो आणि उत्पन्न काढतो मात्र दलित आदिवासी भूमीहिन कास्तकारांची ७/१२ उतार्याला नोंद नसल्यामुळे नैसर्गिक आपत्ती, शासकीय मदत, बँकेचे कर्ज यापासून दलित आदिवासी भूमीहिन कास्तकार वंचित आहे. म्हणून जालना जिल्ह्यात अतिवृष्टीने शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे शेतकर्यांच्या सोबत जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी भूमीहिन कास्त पट्टे पंचनामा करून शेतकर्यांसोबत नुकसान भरपाई सरसकट २५ हजार प्रत्येकी देण्यात यावी.

**विज मंत्र्यांचा विज वितरण कंपनीवर वचक नाही- ॲड. मगरे**

महाराष्ट्र विज वितरण कंपनी ही कुचकामी ठरलेली असून संबंधीत मंत्र्याचा महाराष्ट्र विज वितरण कंपनीवर कसल्याही प्रकारचा अंकुश राहिलेला नाही. जनता विजेमुळे त्रस्त आहे. मिनिटामिनिटाला विजेचा लपंडाव सुरू आहे. जनतेला विज ग्राहक म्हणून विजेचे बिल देण्यात येत आहे. मात्र अव्वाच्या सव्वा बिले भरावे लागत आहे. विज वितरण कंपनीचे अधिकारी आणि कर्मचारी नेमके काय करतात ? सातत्याने विजेचा लपंडाव सुरु आहे. हेल्पलाईनद्वारे कोणी फोन घेत नाही. विज वितरण कार्यालयात तक्रार घेवून गेल्यास कोणीही अधिकारी कर्मचारी जागेवर भेटत नाही. कधीतरी भेटलेतर उडवा- उडवीचे उत्तरे देवून अधिकारी मिटींगला आहे. दौर्यावर गेले आहे असे खोटी माहिती सांगतात आणि म्हणून ही सर्व जबाबदार उर्जा मंत्र्यांची आहे. यापुढे विजेचा लपंडाव असाच चालू राहिल्यास जनतेला रस्त्यावर उतरून विज वितरण कार्यालयावर धडक महामोर्चा काढण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण कार्यालयावर राहील, इशाराही निवेदनात दिला आहे. या व इतर कायदेशीर मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात गांभीर्याने विचार करून प्रशासनास आदेशित करून राज्यात दलित आदिवासी भूमिहिन कास्त पट्टे नावे करून, ७/१२ उतारा देण्यात यावा व शासकीय पडीत जमिनीवर शेतीसाठी झालेले अतिक्रमण नियमानुकुलित करावे. तसेच जनहिताच्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी व विज वितरण कंपनीला आपण ताकीद द्यावी जेणे करून जनतेला सुरळीतपणे विज मिळेल, असेही

मगरे यांनी म्हटले आहे. तर आज जिल्हाधिकारी जालना यांच्यामार्फत जनआक्रोश विराट आंदोलनातून मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात येत आहे. या निवेदनाची गांभीर्याने दखल घ्यावी अन्यथा पुढील आंदोलन हे आक्रमक पावित्रा घेवून करु, असा इशाराही दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी दिला आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस येत्या १० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांना येत्या दिनांक १० ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विद्यापीठाने आपल्या १२ विविध विद्याशाखांच्या १३८ वेगवेगळ्या प्रकारच्या पदवी, पदव्युत्तर, पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन सुरू आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) नवीन नियमानुसार विद्यार्थ्यांना नियमित पदवीसोबत दुरशिक्षणाद्वारे अधिकची एक पदवी मिळवता येईल किंवा मुक्त विद्यापीठाच्याच दोन पदव्यांना एकाचवेळी प्रवेश घेता येईल.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या वर्षी विद्यापीठाने पारंपारिक शिक्षणक्रमांसह नवीन आणि व्यावसायिक शिक्षणक्रम देखील सुरु केलेले आहेत. त्यात विशेषतः संगणकशास्त्र, विज्ञान व माहिती तंत्रज्ञान, कृषी तसेच व्यावसायिक क्षेत्रातील बदलत्या गरजा लक्षात घेऊन डेटा नालिटिक्स, आयबीएम सर्टिफिकेट, डिजिटल




फोटोग्राफी, शेतकरी उत्पादक कंपनी व्यवस्थापन, श्वानपालक प्रबोधन, सौर व पवन उर्जा आदींशी संबंधित नवीन शिक्षणक्रम यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना घरबसल्या आणि त्यांच्या सवडी व आवडीनुसार शिक्षण पूर्ण करण्याची संधी मुक्त विद्यापीठ दूरस्थ शिक्षण प्रणालीतून उपलब्ध करून देत आले आहे. नोकरी - व्यवसाय करणारे, गृहिणीं किंवा ज्यांना नियमित महाविद्यालयात जाणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांसाठी ही एक उत्तम संधी आहे. प्रवेश घेण्यासाठी इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला (https://ycmou.digitaluniversity.ac/) भेट द्यावी किंवा विद्यापीठाच्या नजीकच्या अभ्यास केंद्राशी संपर्क साधावा व आपल्या उज्वल भविष्यासाठी ऑनलाईन प्रवेश घ्यावा. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या हेल्पलाइन क्रमांक ०२५३ - २२३०५८० / २२३१७१५ /२२३०१०६ / २२३१७१४ किंवा ९३०७५७९८७४, ९३०७५६७१८२, ९२०७०४६७५० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठाचे विद्यार्थी सेवा विभाग संचालक डॉ. प्रकाश देशमुख यांनी केले आहे.

# बालिकेची माहिती देणाऱ्यास महाराष्ट्र पोलिस दलाकडून १ लाख रुपयांचे बक्षीस जाहिर

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अंबड येथील फैसलाबाद कॉलनीमधील कु. इकरा अमजद शेख या मुलीला दि.१२ जानेवारी २०२५ रोजी अंदाजे दुपारी ३.३० वाजेदरम्यान अज्ञात व्यक्तीने आमिष दाखवून पळवुन नेले आहे. त्यावेळी बालिकेचे वय ३ वर्ष १ महिना असे होते. तरी या बालिकेविषयीची माहिती देणाऱ्यास महाराष्ट्र पोलिस दलाकडून १ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे, अशी माहिती गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) पोलिस निरीक्षक अंजली राजपुत यांनी दिली आहे.



कु. इकरा नावाची बालिका हरवल्याची अमजद हाजी शेख यांनी फिर्याद दिल्यावरुन अंबड पोलिस ठाण्यात गु.र.प.२२/२०२५ कलम १३७(२) भा.न्या.सं.प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटनेच्या दिवसापासून बालिका ही अद्यापपर्यंत आढळुन आलेली नाही. तरी सद्यस्थितीत या गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी), जालना यांच्याकडून करण्यात येत आहे. कु. इकरा हीचा शरीर बांधा सडपातळ असून उंची २.५ फुट आहे. चेहरा गोल, रंग सावळा असून काळे कुरळे केस आहेत. तिला हिंदी भाषेतील काही शब्द बोलता येतात. अंगावर गुलाबी रंगाचा फ्रॉक असून तिची मन:स्थिती चांगली आहे. तरी या वर्णनाची बालिका आढळुन आल्यास सीआयडीच्या पोलिस निरीक्षक अंजली राजपुत (मो.८६२५८५३७८६) यांच्याशी संपर्क साधावा. बालिका अथवा तिला पळविणाऱ्या इसमाविषयी माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार आहे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## परतूर येथील साईनाथ मंदिर परिसरात तीस वर्षापासून दसरा उत्सव साजरा

# तब्बल ४१ फूट रावण प्रतिमा सज्ञ!

**परतुर । प्रतिनिधी -** गेल्या ३० वर्षापासून परंपरागत चालू असलेल्या दसऱा उत्सव समितीची कार्यकारणी यंदाही घटित करण्यात आली असून यात अध्यक्षपदी राजकुमार भारुका तर कार्याध्यक्ष पदी अजय देसाई सचिव पदी कैलास सोळंके तर कोषाध्यक्षपदी माणिक जैस्वाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.









या पत्रकार बांधवांच्या पुढाकाराने गेल्या ३० वर्षापासून येथील साईनाथ मंदिर परिसरामध्ये विजयादशमीनिमित्त रावण प्रतिमेचे दहन केल्या जाते. यावर्षीही तब्बल ४१ फुटी रावण प्रतिकारकमक प्रतिमेची दहन होणार असल्याची माहिती कार्यकारिणीने दिली आहे. सदरील प्रतिमा हिंगोली येथून खास तयार करण्यात आली आहे यामध्ये रंगबिरंगी आतषबाजी आतषबाजी व भव्य दिव्य प्रतिकारकमक पुतळा हे आकर्षण राहणार आहे. सायंकाळी साडेसहा वाजता विजयादशमीनिमित्त दोन सप्टेंबर रोजी सदरील रावण दहन संपन्न होणार असून यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर, मॉ.बागेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन, शिवाजीराव जाधव. माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया, राष्ट्रवादी युवा चे कपिल आकात, शिवसेनेचे महेश नळगे,माधराव मामा कदम ,काँग्रेसचे बाळासाहेब आकात तसेच, माजी नगराध्यक्ष विनायक काळे विजय राखे, शिवसेनेचे आसाराम बोराडे, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे पोलीस निरीक्षक सुदाम भागवत तहसीलदार डॉ. प्रतिभा गोरे यासह लोकप्रतिनिधी व मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. संबंध परतुर कर व परिसरातील भाविक नागरिक सिम्बलंगणासाठी विजयादशमीनिमित्त सदरील साईनाथ मंदिर परिसरामध्ये गोळा होत असतात यावेळी हजारो उपस्थितांमध्ये रावण दहन परंपरागत कार्यक्रम संपन्न होत असतो. सदरील कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान कार्यकारिणीने केले आहे.




**केरळ भाजपा प्रवक्ता पिंटू महादेव ह्याने टीव्ही वरील चर्चेत लोकसभेचे विरोधपक्षनेते श्री. राहुलजी गांधी यांना छातीत गोळी मारून हत्या करण्याची धमकी दिली. त्याविरोधात त्याच्यावर कायदेशीर कारवाई करून तत्काळ अटक करावी ही मागणी करण्याचे निवेदन युवक काँग्रेस कडून जालना जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बंसल यांना दिले. यावेळी युवक काँग्रेस प्रदेश सचिव चैतन्य जायभाये, युवक काँग्रेस महासचिव सचिन कचरे, युवक काँग्रेस आऊटरिच जिल्हा अध्यक्ष रघुवीर गुडे आणि युवक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष देवराज डोंगरे उपस्थित होते.**

# सेवा पंधरवाडा अभियान यशस्वी करुन जालना क्रमांक एक वर आणा - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जन संघाचे अखिल भारतीय सरचिटणीस पंडित दीनदयाळ उपाध्ये व माथाडी कामगार नेते स्व.आण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी कार्यालय, जालना येथे वरील दोन्ही ही महापुरुषांची जयंती आज (दि.२५ सप्टेंबर) रोजी प्रतिमेस पुष्पहार अर्पण व अभिवादन करून साजरी करण्यात आली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात मा.आ. नारायण कुचे कार्यकर्त्यांना आवाहन केले की, आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये महायुतीचा झेंडा फडकवा व जालना महानगर जिल्ह्यासह जालना जिल्ह्यात सर्व मंडळात भारतीय जनता पक्ष क्रमांक एक वर राहील यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी आजपासून कामाला लागून जिल्हा भाजपमय करावा असे आवाहन केले. यावेळी व्यासपीठावर जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर पाटील भांदरगे, भाजपा जेष्ठ नेते शिवाजीराव थोटे, माजी महानगर जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर, सतीश जाधव, युवा नेते अक्षय भैया गोरंट्याल, संतोष लोखंडे, साहेबराव कानडजे, महानगर महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ.शुभांगीताई देशपांडे, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्षा सौ.संध्याताई देठे, सरचिटणीस अरुणाताई जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल कोलते, भाजपा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सोपान पेंढारकर, सिद्धिविनायक मुळे इत्यादीसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.




यावेळी बोलताना भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, भाजपा चा सेवा पंधरवाड्यामध्ये दिलेले सर्व कार्यक्रम कार्यकर्त्यांनी जिल्हा स्तरापासून मंडळ स्तर व बूथ स्तरापर्यंत यशस्वीपणे राबवून संघटनात्मक दृष्ट्या भारतीय जनता पक्ष जालना जिल्ह्यासह महाराष्ट्रामध्ये या अभियानात क्रमांक एक वर न्यावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, भाजपा महानगर उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, प्रा.राजेंद्र भोसले यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय तसेच स्व.आण्णासाहेब पाटील यांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकणारे सविस्तर असे मार्गदर्शन केले.

यावेळी माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, महेश निकम, अमोल धानुरे, संजय डोंगरे, संजय आटोळे, पुरुषोत्तम उढाण, सरचिटणीस सुनील पवार, गोविंद ढेंबरे, जिल्हा चिटणीस राजू साळवे, नगरसेवक शशिकांत घुगे, रमेश गौरक्षक, जिवन सले, नंदकिशोर गरदास, विठ्ठलसिंग राणा, शंकर लामगे, दीपक ठाकूर, बाबा उगले, रवी अग्रवाल, राजू गवई, वर्षा ठाकूर, मंदाताई पवार, वैशाली बनसोडे, दिपाली विन्नीवाले, वंदना ढगे, शितल तनपुरे, अमोल कारंजेकर, परीक्षित शिंदे, द्वारकासेठ जाधव, सुभाष सले, अनिल सरकटे, गजानन खरात, भाऊसाहेब काकडे, बाबुराव भवर, रामलाल जाधव, काकासाहेब घुले, गणेश जल्लेवार, राजाराम जाधव, सतीश केळकर, जगदीश येनगुपटला, हरिभाऊ गोरे, नागेश अंभोरे, प्रशांत आढावे, बद्री वाघ, डोंगरसिंग साबळे, दौलत भुतेकर, महेश मुळे, सेवकराम नारियलवाले, श्रीराम वाघ, रमेश शहाणे, सुदर्शन काळे, कल्याण काळे, निलेश गवळी, कैलास उबाळे, विष्णू डोंगरे, उद्धव ढवळे, कृष्णा गायके, संतोष खंडेलवाल, योगेश शिमगे आदींची उपस्थिती होती.

# पूरग्रस्तांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे - मुख्यमंत्री फडणवीस

## टंचाईच्या सर्व सवलती मिळणार, आपत्तीग्रस्तांकडून वसुली नको; बँकाना निर्देश

**मुंबई -** राज्य शासन पूरग्रस्ताच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. या भागातील शेतकरी, आपत्तीग्रस्त नागरिकांना टंचाई प्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसुली थांबवावी, असे निर्देशही बँकाने दिल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकरी सध्या अडचणीत आहे. हे लक्षात घेऊन बँकांना वसुली थांबवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पूरग्रस्त कुटुंबांना गहू-तांदूळ, डाळी व आवश्यक वस्तूंचे कीट वितरित करण्यात येत आहे. विहीर खचणे, शेतजमीन खरडून जाणे, अशा केंद्र सरकारच्या निकषाबाहेर जाऊन, झालेल्या नुकसानीवरही राज्य सरकार स्वतंत्र मदत करणार आहे. नुकसानीचे पंचनामे दोन-तीन दिवसांत पूर्ण होऊन पुढील आठवड्यात केंद्राला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. मात्र, केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने स्वतःच्या निधीतून मदत सुरू केली असून नंतर केंद्राकडून ती रक्कम 'रिइम्बर्समेंट'च्या स्वरूपात मिळेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.